बँकेच्या वेबसाईट तसेच नोकरभरतीच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेकरीता जाहिरातीचा मसुदा.

## मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित

मुंबई बँक भवन, २०७, डॉ.डी.एन.रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१.

## नोकर भरती करीता जाहिरात

मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित खालील नमूद पदांकरीता पात्र/इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे. अर्ज सादर करण्याची संपूर्ण प्रक्रीया, मार्गदर्शन तसेच पदांकरीता आवश्यक त्या शैक्षणिक व इतर अहर्ता तसेच इतर तपशिल http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. तसेच बँकेच्या www.mdccbank.com या वेबसाईटवर नोकर भरतीकरीताच्या जाहिरातीचा तपशिल उपलब्ध आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणिक व इतर अर्हता |
|---|---|---|---|
| १ | उपव्यवस्थापक Deputy Manager | १९ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कुठल्याही शाखेतील पदव्यूत्तर पदवी / कुठल्याही शाखेतील पदवी व किमान ५ वर्षाचा मध्यम/ वरिष्ठ व्यवस्थापनातील बँकींग क्षेत्रातील अनुभव.<br>विशेष अर्हता/प्राधान्य :- CA/ MBA Finance/ Post Graduate from Recognized University in any discipline /JAIIB / CAIIB/C-PEC (Certified Professional in Co-operative Banking)/ जी.डी.सी.ॲन्ड ए /संगणक ज्ञान आवश्यक.<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>४० ते ४५ वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी - ८५०-५३/२-९५६-७५/२-११०६-१००/४-१५०६-१२५/३-१८८१-१५०/२-२१८१-१७५/२-२५३१-२२५/२-२९८१-२७५/२-३५३१-३२५/३-४५०६-३७५/३-५६३१= २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.११२४१.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.२२४८२.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.४८९१३.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| २ | अधिकारी -स्टेनो Officer Grade - Steno (English) - १ Post Officer Grade - Steno (Marathi) -१ Post | २ | मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेतील पदवी,<br>विशेष अर्हता/प्राधान्य :- पदव्यूत्तर पदवी / जी.डी.सी.ॲन्ड ए./ संगणक ज्ञान आवश्यक/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking)/ एचडीसीएम/ JAIIB / CAIIB/ बँकींग क्षेत्रातील अनुभव<br>स्टेनो करीता इंग्रजी कमीत कमी १२० शब्द / मराठी कमीत कमी १०० शब्द प्रति मिनिटे वेगाचे स्टेनोग्राफी परिक्षा पास केल्याचे मान्यताप्राप्त प्रमाणपत्र. तसेच इंग्रजी स्टेनो करीता कमीत कमी प्रति मिनिट ६० शब्द टंकलेखन परिक्षा उतीर्ण तसेच मराठी स्टेनो करीता प्रति मिनिट ६० शब्द टंकलेखन परिक्षा उतीर्ण (GCC/ ITI )<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक, संगणकीकृत टंकलेखन येणे आवश्यक<br>वय ३० ते ४० वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी -६५०-४२/४-८१८-५३/२-९२४-७५/२-१०७४-१००/४-१४७४-१२५/३-१८४९-१५०/२-२१४९-१७५/२-२४९९-२००/२-२८९९-२५०/२-३३९९-३००/२-३९९९ = २५ वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.८५९६.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१७१९२.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.३७८०४.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| ३ | अधिकारी - सर्वसाधारण<br>Officer - General Category | ३२ | मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेतील पदवी व बँकींग क्षेत्रातील किमान २ वर्षाचा अनुभव<br>विशेष अर्हता/प्राधान्य :- पदव्यूत्तर पदवी / जी.डी.सी.ॲन्ड ए / संगणक ज्ञान आवश्यक/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking)/ एचडीसीएम/ JAIIB / CAIIB/बँकींग मधील अनुभव.<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>वय ३० ते ४० वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी - ६५०-४२/४-८१८-५३/२-९२४-७५/२-१०७४-१००/४-१४७४-१२५/३-१८४९-१५०/२-२१४९-१७५/२-२४९९-२००/२-२८९९-२५०/२-३३९९-३००/२-३९९९ = २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.८५९६.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१७१९२.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.३७८०४.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| ४ | अधिकारी - सुरक्षा<br>Security Officer | १ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी, माजी सैनिक (NCO- सुभेदार मेजर ) / कमिशन्ड अधिकारी, माजी पोलिस अधिकारी (कमीत कमी निरिक्षक पदी काम केल्याचा अनुभव )<br>विशेष प्राधान्य : बँकिंग आस्थापनांमधून सुरक्षा अधिकारी म्हणून काम केल्याचा अनुभव<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>वय ३५ ते ४५ वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी -६५०-४२/४-८१८-५३/२-९२४-७५/२-१०७४-१००/४-१४७४-१२५/३-१८४९-१५०/२-२१४९-१७५/२-२४९९-२००/२-२८९९-२५०/२-३३९९-३००/२-३९९९ = २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.८५९६.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१७१९२.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.३७८०४.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| ५ | बँक सहाय्यक - सर्वसाधारण<br>Bank Assistant - General Category | १५७ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदवी,<br>विशेष अर्हता प्राधान्य : BBI / BAF / मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही शाखेतील पदव्युत्तर पदवी / जी.डी.सी.ॲन्ड ए./ संगणक ज्ञान आवश्यक/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) /एचडीसीएम/JAIIB / CAIIB इ. / बँकींग क्षेत्रातील अनुभव<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>वय २० ते ३५ वर्षे |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी -४००-२७/४-५०८-३०/३-५९८-३५/२-६६८-४२/४-८३६-५३/२-९४२-७५/२-१०९२-१००/४-१४९२-१२५/३-१८६७-१५०/१-२०१७.= २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.५२९०.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१०५८०.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.२३९१८.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| ६ | बँक सहाय्यक - टंकलेखक इंग्रजी / मराठी<br>३ मराठी टंकलेखक<br>१ इंग्रजी टंकलेखक<br>१ इंग्रजी व मराठी टंकलेखन येणारा टंकलेखक असे एकूण ५.<br>A) Bank Assistant Grade - Typist (English) - १ Post<br>B) Bank Assistant Grade -Typist (Marathi) - ३ Post<br>C) Bank Assistant Grade -Typist (English & Marathi) - १ Post<br>Total Post - ५ | ५ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदवी तसेच ४० शब्द प्रति मिनिट वेगाचे इंग्रजी / मराठी टंकलेखन परिक्षा पास केल्याचे मान्यताप्राप्त संस्थेचे प्रमाणपत्र. संगणकीकृत टंकलेखन येणे आवश्यक.<br>विशेष अर्हता प्राधान्य : मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदव्यूत्तर पदवी / C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) / जी.डी.सी. ॲन्ड ए. / संगणक ज्ञान आवश्यक/ एचडीसीएम/ JAIIB / CAIIB इ. बँकेमधील टंकलेखन विभागामध्ये काम केल्याचा अनुभव.<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक. इंग्रजी व मराठी असे दोन्ही टंकलेखन येणा-या उमेदवारास प्राधान्य दिले जाईल.<br>वय २० ते ३५ वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी - ४००-२७/४-५०८-३०/३-५९८-३५/२-६६८-४२/४-८३६-५३/२-९४२-७५/२-१०९२-१००/४-१४९२-१२५/३-१८६७-१५०/१-२०१७ = २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.५२९०.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१०५८०.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.२३९१८.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| ७ | बँक सहाय्यक - ग्रंथपाल<br>Bank Assistant Grade - Librarian - १ Post | १ | मान्यताप्राप्त विद्यापीठाची ग्रंथपाल विषयातील पदवी (B. Lib) अथवा कोणत्याही विषयातील पदवी व मान्यताप्राप्त संस्थेची ग्रंथपाल विषयातील पदवीका,<br>विशेष अर्हता प्राधान्य : मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदव्यूत्तर पदवी / ग्रंथपाल विषयातील पदव्यूत्तर पदवी ( M. Lib)/ C-PEC (Certified Professional in Co-operative Banking), जी.डी.सी. ॲन्ड ए. / संगणक ज्ञान आवश्यक / एचडीसीएम/ JAIIB / CAIIB इ. बँकेमध्ये ग्रंथपाल म्हणून काम केल्याचा अनुभव.<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>वय २० ते ३५ वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी ४००-२७/४-५०८-३०/३-५९८-३५/२-६६८-४२/४-८३६-५३/२-९४२-७५/२-१०९२-१००/४-१४९२-१२५/३-१८६७-१५०/१-२०१७ = २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.५२९०.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१०५८०.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.२३९१८.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८ | बँक सहाय्यक - टेलिफोन ऑपरेटर कम क्लार्क कम रिसेप्शनिस्ट Bank Assistant Grade -Telephone Operator cum Clerk cum Receptionist - २ Post | २ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही विषयाची पदवी व मासमिडीया, पत्रकारिता, हॉस्पीटेलिटी मॅनेजमेंट मधील पदवी व पदविका, मान्यताप्राप्त संस्थेचा टेलिफोन ऑपरेटरचा कोर्स केल्याचे प्रमाणपत्र.<br>विशेष अर्हता प्राधान्य : मान्यताप्राप्त विद्यापीठाची वाणिज्य विषयातील पदव्यूत्तर पदवी / C-PEC (Certified Professional in Co-operative Banking)/ जी.डी.सी. ॲन्ड ए. / संगणक ज्ञान आवश्यक / एचडीसीएम/ JAIIB / CAIIB इ. बँकेमध्ये रिसेप्शनिस्ट म्हणून / टेलिफोन ऑपरेटर विभागामध्ये काम केल्याचा अनुभव.<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>वय २० ते ३५ वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी ४००-२७/४-५०८-३०/३-५९८-३५/२-६६८-४२/४-८३६-५३/२-९४२-७५/२-१०९२-१००/४-१४९२-१२५/३-१८६७-१५०/१-२०१७ = २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.५२९०.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१०५८०.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.२३९१८.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| ९ | बँक सहाय्यक - स्वीय सहाय्यक Bank Assistant Grade -Personal Assistant - २ Post | २ | मान्यताप्राप्त विद्यापिठाची कोणत्याही विषयातील पदवी व मासमिडीया / पत्रकारिता विषयातील पदवीका / मान्यताप्राप्त विद्यापीठाची मासमिडीया / पत्रकारिता विषयातील पदवी. तसेच मराठी व इंग्रजी टंकलेखन ४० प्रति शब्द प्रति मिनिट प्रमाणपत्र परिक्षा उत्तीर्ण. संगणकीकृत टंकलेखन येणे आवश्यक.<br>विशेष अर्हता प्राधान्य : मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही विषयातील पदव्यूत्तर पदवी / C-PEC (Certified Professional in Co-operative Banking) / जी.डी.सी. ॲन्ड ए./ संगणक ज्ञान आवश्यक /इंग्रजी / मराठी स्टेनोग्राफी परिक्षा उत्तीर्ण / एचडीसीएम/ JAIIB / CAIIB इ. बँकेमध्ये वरिष्ठ पातळीवरील अधिकारी / पदाधिका-यांचे स्विय्य सहाय्यक म्हणून काम केल्याचा अनुभव.<br>मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक<br>वय २० ते ३५ वर्षे<br>सेवेत कायम झाल्याचेनंतर मिळणारी वेतन श्रेणी -४००-२७/४-५०८-३०/३-५९८-३५/२-६६८-४२/४-८३६-५३/२-९४२-७५/२-१०९२-१००/४-१४९२-१२५/३-१८६७-१५०/१-२०१७ = २५ वर्षे<br>अ) सुरुवातीचे एकत्रित वेतन -(१ वर्ष प्रशिक्षण कालावधी )- रु.५२९०.००<br>ब) प्रशिक्षण कालावधीनंतर पुढील ६ महिने उमेदवारी कालावधीमध्ये मिळणारे एकत्रित वेतन-रु.१०५८०.००<br>क) सेवेत कायम झाल्याचेनंतर सुरुवातीचे वेतन- रु.२३९१८.०० व त्या त्या वेळचे नियमानुसार मिळणारे भत्ते व सवलती. |
| | एकूण | २२१ | |

नोकरभरती प्रक्रीयेचे वेळापत्रक

| अ.क्र. | तपशिल | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १ | http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर रजिस्ट्रेशन करणे / शुल्कासह अर्ज भरणे. | दि.०२/०९/२०१९ ते दि.२१/०९/२०१९ * |
| २ | परिक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ३ | परिक्षा दिनांक | http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ४ | मुलाखत दिनांक | http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |
| ५ | अंतीम निकाल दिनांक | http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात येईल. |

* http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर रजिस्ट्रेशन करणे / शुल्कासह अर्ज भरणे प्रक्रीया दि.२१/०९/२०१९ रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत उपलब्ध राहील.

## सर्वसाधारण सूचना

१) उमेदवार भारतीय नागरिक असावा व महाराष्ट्रात १५ वर्षापेक्षा जास्त कालावधीचे कायम स्वरुपी वास्तव्य असावे. याबाबत डोमिसाईल प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२) उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक राहील.

३) यशस्वी उमेदवारांना स्वखर्चाने वैद्यकिय चाचणीसाठी जावे लागेल. वैद्यकिय चाचणीत पात्र झाल्याशिवाय त्यांना नेमणूक दिली जाणार नाही.

४) यशस्वी उमेदवारांची बँकेच्या सेवेत नेमणूक झाल्यानंतर त्यांना किमान १ वर्षाचा प्रशिक्षण कालावधी राहिल. प्रशिक्षण कालावधी संपल्यानंतर ६ महिने उमेदवारीचा कालावधी राहिल.

५) यशस्वी उमेदवारांना प्रशिक्षण कालावधीत एकत्रित पगार (प्रशिक्षण भत्ता) देण्यात येईल, (मासिक मूळ वेतनाच्या (बेसिक + डि.ए. + व्ही.डी.ए. कमाल २५% वेतन (प्रशिक्षण भत्ता) मिळेल.)) व उमेदवारीच्या कालावधीत त्यांना मासिक मूळ वेतनाच्या (बेसिक + डि.ए. + व्ही.डी.ए. कमाल ५०% वेतन मिळेल.) देण्यात येईल.

६) प्रशिक्षण व उमेदवारी कालावधीतील सुट्टया :- प्रशिक्षण व उमेदवारी कालावधीतील कर्मचारी / अधिका-याला एका वर्षात फक्त १३ दिवसांची पूर्ण पगारी किरकोळ रजा उपभोगता येईल. या व्यतिरिक्त त्यांनी घेतलेल्या रजा हया बिनपगारी असतील. तसेच अशा बिन पगारी रजेच्या कालावधीमुळे तितक्या दिवसांनी कायम करण्याची तारीख पुढे जाईल म्हणजे उमदेवारांचा कालावधी वाढेल.

७) सानुग्रह अनुदान / बोनस :- प्रशिक्षण व उमेदवारी कालावधीत कर्मचारी / अधिका-याला कोणत्याही प्रकारचे सानुग्रह अनुदान/ बोनस दिला जाणार नाही.

८) बँकेच्या सेवेत रुजु होण्यापूर्वी उमेदवाराने शैक्षणिक पात्रतेचे दाखले, जन्म तारखेचा दाखला व जातीचे सक्षम अधिका-याकडील प्रमाणपत्र रजिस्टर्ड मेडिकल प्रॅक्टीशनरकडील शारिरीकदृष्टया बँकेचे काम करण्यास लायक असल्याबाबतचा दाखला सादर करावा लागेल. याबाबत बँकेकडून खातारजमा केली जाईल. यामध्ये माहिती खोटी असल्याचे आढळल्यास बँकेची फसवणूक केली असे गृहीत धरुन सदर उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच सदर उमेदवार बँकेच्या सेवेत असल्यास त्याला कामावरुन कमी करण्यात येईल व त्यांना अदा केलेल्या वेतनातील ५०% रक्कम वसूल केली जाईल.

९) बँकेच्या सेवेत रुजू होताना कर्मचा-याने ३ वर्षाचा बॉण्ड लिहून देणे आवश्यक आहे. तसेच सदर कालावधीमध्ये उमेदवार नोकरी सोडून जात असल्यास त्याने एक महिन्याची नोटीस व रु.५०,०००/- इतकी रक्कम बँकेकडे जमा केल्यानंतरच त्याचा राजिनामा मंजूर होईल.

१०) नोकर भरती करीता ऑनलाईन परिक्षा तसेच मुलाखत देणे आवश्यक आहे. ऑनलाईन परिक्षा व मुलाखत यांचे प्रमाणे ९० : १० आहे. १० पैकी ५ गुण मुलाखतीसाठी व ५ गुण शैक्षणिक पात्रतेकरीता दिले जातील. शैक्षणिक पात्रतेचे गुण संचालक मंडळाचे मान्यतेनुसार राहतील.

११) अर्जदार उमेदवाराने अर्ज करण्याच्या दिनांकारोजी उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे आवश्यक त्या वयोमर्यादेचे पालन करीत असल्याबाबत खात्री करून मगच अर्ज करावा.

१२) ऑनलाईन परिक्षेकरीता अर्ज करण्यापूर्वी जाहिरातीतील सर्व सूचना तसेच http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवरील मार्गदर्शक सूचना काळजीपूर्वक पहाव्यात.

१३) नोकर भरती करीता http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर नमूद केल्याप्रमाणे रजिस्ट्रेशन करणे आवश्यक राहील. ऑनलाईन पध्दतीनेच अर्ज स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारे पाठविण्यात/ सादर करण्यात आलेले अर्ज ग्राह्य धरणे जाणार नाहीत.

१४) ऑनलाईन परिक्षेकरीताचे शुल्क खालील प्रमाणे राहील.

| अ.क्र. | पदाचे नाव | परिक्षेचे शुल्क |
|---|---|---|
| १ | उपव्यवस्थापक | रू.१५००/- + GST = रू.१७७०/- |
| २ | अधिकारी श्रेणी | रू.१२००/- + GST = रू.१४१६/- |
| ३ | बँक सहाय्यक श्रेणी | रू.१०००/- + GST = रू.११८०/- |

टिप :

- उपरोक्त परिक्षा शुल्क विना व्याज / विना परतावा आहे.

१५) रजिस्ट्रेशनची कार्यपध्दती, शुल्क भरणा तसेच ऑनलाईन परिक्षेकरीताचा सिलॅबस / माहिती तसेच परिक्षेचे माध्यम व उमेदवारांकरीता सर्वसाधारण सूचना इ. http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

१६) नोकर भरती प्रक्रीया संपेपर्यंत उमेदवारानी http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटचे वेळोवेळी अवलोकन करणे आवश्यक आहे. जेणेकरून उमेदवारांना अद्यावत माहिती प्राप्त होईल. सदर बाबतची जबाबदारी उमेदवाराची राहील.

१७) उमेदवारांनी रजिस्ट्रेशन करताना त्यांचा ई-मेल आय.डी., मोबाईल क्रमांक व आधार क्रमांक अचूक भरणे आवश्यक आहे. तसेच मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. मध्ये नोकर भरती प्रक्रीया संपेपर्यंत बदल करू नये. तसेच चुकीचा / अपूर्ण मोबाईल क्रमांक व ई-मेल आय.डी. दिल्यास तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रीयेदरम्यान भरतीबाबत पाठविल्या जाणा-या सूचना, संदेश, माहिती उमेदवारांना प्राप्त न झाल्यास संपूर्ण जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. तसेच याबाबत संदेशवहनात तांत्रिक अडथळे उद्भवल्यास त्याला बँक जबाबदार रहाणार नाही.

१८) उमेदवाराचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रे व अन्य प्रमाणपत्र व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि उमेदवाराने काळजीपूर्वक व संपूर्ण सत्य माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास, भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही. अथवा त्यावर काहीही कार्यवाही केली जाणार नाही. ऑनलाईन अर्जामध्ये भरलेली माहिती उमेदवाराने प्रमाणित केल्याचे नंतर बदलता येणार नाही. ऑनलाईन अर्ज करण्यापूर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अटी व शर्ती तसेच शैक्षणिक व इतर अर्हता इ. संदर्भात पात्रता तपासूनच अर्ज भरावा.

१९) उमेदवाराची ऑनलाईन परिक्षा अर्जात नमूद केल्याप्रमाणे गृहीत पात्रतेनुसार कागदपत्रांच्या पूर्व तपासणी / छाननी शिवाय घेतली जाणार असल्याने परिक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराची निवड झाली असे गृहीत धरता येणार नाही. कागदपत्राच्या पूर्ण छाननीअंती , पदांकरीता आवश्यक ती पात्रता धारण करत असलेबाबत छाननी अंती उमेदवाराची निवड निश्चित केली जाईल. ऑनलाईन परिक्षेमध्ये उमेदवारास आवश्यक ते गुण मिळाले असले तरी सदर छाननी प्रक्रीयेमध्ये उमेदवार पात्र नसल्याचे आढळल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल व त्याला निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

२०) नोकर भरती प्रक्रीयेच्या वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या तारखांमध्ये काही अपरिहार्य कारणास्तव बदल करण्याचा अधिकार बँक राखून ठेवत आहे. याबाबत सर्वाधिकार बँकेकडे राहतील. बदलांबाबत सूचना उपरोक्त नमूद http://mumbaidccbank.co.in या वेबसाईटव्दारे कळविण्यात येतील. उमेदवारास लेखी कळविले जाणार नाही.

२१) उमेदवारांना ऑनलाईन परिक्षा, कागदपत्र पडताळणी, प्रत्यक्ष मुलाखत इत्यादींना हजर रहाण्याकरीता तसेच निवड झाल्यास पदावर रूजू होण्याकरीता कोणत्याही स्वरूपाचा खर्च अथवा परतावा दिला जाणार नाही. उमेदवाराला स्वखर्चाने सदर प्रक्रिया पार पाडावी लागेल.

२२) ऑनलाईन परिक्षेसाठी उमेदवाराला प्रवेश पत्रासह, मूळ आधार कार्ड / ड्रायव्हिंग लायसन्स / पॅनकार्ड / मतदान ओळखपत्र सोबत आणणे आवश्यक आहे.

२३) ऑनलाईन परिक्षा केंद्रामध्ये उमेदवाराचे वर्तन दोषास्पद आढळल्यास सदर उमेदवाराची उमेदवारी बाद करण्यात येईल तसेच अशा उमेदवारावर आवश्यक ती कारवाई करण्याचे अधिकार बँक राखून ठेवत आहे.

२४) जाहिरातीत नमूद केलेल्या एका श्रेणीपेक्षा अधिक श्रेणीत उमेदवारांना अर्ज करावयाचा झाल्यास तसे करता येईल परंतु पदनिहाय स्वतंत्र अर्ज शुल्कासहीत करणे आवश्यक राहील.

२५) परिक्षा शुल्क भरणा न केलेले ऑनलाईन अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.

२६) स्टेनो , टायपिस्ट इ.पदांकरीता ऑनलाईन परिक्षा तसेच मुलाखती व्यतिरिक्त या पदांकरीता आवश्यक अशी नैपुण्य (स्कील) टेस्ट घेण्यात येईल व त्यात उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

सदर जाहिरातीमध्ये नमूद पदांची संख्या बँकेच्या आवश्यकतेनुसार कमी / जास्त होवू शकते. नोकर भरती विषयक सर्वाधिकार बँक राखून ठेवत असून संपूर्ण अथवा अंशतः प्रक्रीया रद्द करण्याचे अधिकार देखील राखून ठेवत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी

X:\Naik_saheb\sd13682(23.08.19).doc